International Journal of Advance and Applied Research (IJAAR)
Peer Reviewed Bi-Monthly
ISSN – 2347-7075
Impact Factor – 6.457
Vol.6 No.6 July–Aug 2019

# सिंधुदुर्ग किल्ल्यची ऐतिहासिक माहिती

**दिपक कोलू वळवी,**

अण्णासाहेब वर्तक महाविद्यालय, वसई (प.),पालघर

**प्रस्तावना:**

महाराष्ट्राला जवळपास ७२०किलोमीटर लांबीची किनारपट्टी लाभली आहे. याच किनारपट्टीवर अनेक जलदुर्ग इतिहासाची साक्ष देत कित्येक शतके आपले अस्तित्व टिकून आहेत छत्रपती शिवाजी महाराजांनी याच जलदुर्गांच्या पाठबळावर कोकण किनारपट्टीवर स्वराज्य भक्कम केले भारतीय आरमाराचे जनक म्हणून छत्रपती शिवाजी महाराजांना अनेक इतिहासकारांनी गौरविले आहे. महाराष्ट्रातील जाल्दुर्गांचाअभ्यास करताना शिवाजी महाराजांचेआरमार विषयक धोरण समजून घेणे अत्यंत गरजेचे ठरते शिवरायांच्या काळात हिंदू धर्मात समुद्रपर्यटन निषिद्ध समजले जात होतेपरंतु शिवरायांनी दूरदृष्टीच्या साह्याने आरमारी शक्ती वाढविण्याकडे विशेष लक्ष दिले आणि 'यस्य आरमार तस्य समुद्र' या तत्त्वाचा अवलंब करून अनेकजलदुर्गांची निर्मिती केली पोर्तुगीज, सिद्धी,डच व इंग्रजांसारख्या समुद्री शत्रूंना रोखण्यासाठी सिंधू सागरावर वर्चस्वनिर्माण करणे आवश्यक होते. त्याकरिता आधीच अस्तित्वात असलेले जलदुर्ग मजबूत केले तर काही किल्ले नव्याने निर्माण केले. त्यांच्यापैकीच एक अत्यंत महत्त्वाचा जलदुर्ग म्हणजे सिंधुदुर्ग किल्लाहा किल्ला छत्रपती शिवाजी महाराजांच्या आरमारी शक्तीची साक्ष देणारा तसेच नैसर्गिकरित्या अभेद्य असा भक्कम जलदुर्ग होता.

**उद्देश:**

१) सिंधुदुर्ग किल्ल्याची ऐतिहासिक पार्श्वभूमी समजून घेणे
२) छत्रपती शिवाजी महाराजांच्या आरमार विषयक धोरणाचा अभ्यास करणे.
३) सिंधुदुर्ग किल्ल्याचे लष्करी व राजकीय महत्त्व अभ्यासणे
४) सिंधुदुर्ग किल्ल्याची रचनाव किल्ल्यातील प्रमुख वास्तूंचा अभ्यास करणे.
५) पर्यटनदृष्ट्या सिंधुदुर्ग किल्ल्याचे महत्व समजून घेणे

**गृहितके:**

१) सिंधुदुर्ग किल्ल्याला मध्ययुगीन भारताच्या इतिहासात महत्त्वाचे स्थान आहे

२) समुद्री शत्रूंनापायबंद घालण्यासाठी या किल्ल्याची निर्मिती करण्यात आली होती.

३) सिंधुदुर्ग किल्ला पर्यटकांसाठी आकर्षण केंद्र आहे

४) काळाच्या ओघात किल्ल्याची पडझड होऊन त्याकडे दुर्लक्ष होत आहे त्यामुळे हा ऐतिहासिक वारसा जतन करणे गरजेचे बनले आहे.

**संशोधन पद्धती:**

प्रस्तुत संशोधन विषय'सिंधुदुर्ग किल्ल्याचे ऐतिहासिक मागोवा'हे असल्यामुळे या विषयावर संशोधन करण्यासाठी ऐतिहासिक, वर्णनात्मक व ग्रंथसूची संशोधन या समाजशास्त्रीय संशोधन पद्धतींचा अवलंब केला आहे. तथ्य संकलनासाठी प्राथमिक व दुय्यम स्वरूपाच्या साधनांचा उपयोग करण्यात आला आहे.

**विषय विवेचन:**

छत्रपती शिवाजी महाराजांच्या आरमारात सिंधुदुर्ग किल्ल्याला अतिशय महत्वाचे स्थान होते भुईकोट आणि डोंगरी किल्यांच्या बरोबरीने सागरी मार्गावरील शत्रूंचे उच्चाटन करण्यासाठी जलदुर्गांची निर्मिती महत्त्वाची आहे. हे ओळखून शिवाजी महाराजांनी सागरी किल्ले निर्माण केलेई. स. १६६४ मध्ये मालवणच्या समुद्रात असलेल्या कुरटे बेटावर शुद्ध खडक मोक्याची जागा व गोड्या पाण्याची सोय या गोष्टी पाहूनत्या ठिकाणी किल्ला बांधण्याची शिवाजी महाराजांनी आज्ञा केली. शिवाजी महाराजांनी त्या काळी हा किल्ला उभारताना किती सूक्ष्म व काटेकोरपणे नियोजन केले आहेत याचे उदाहरण आपल्याला सिंधुदुर्ग किल्ल्याच्या उभारणीतून लक्षात येतेसिंधुदुर्ग किल्ल्याचा अभेद्यपणा हे एक प्रमुख वैशिष्ट्य आहे सिंधुदुर्गच्या आजूबाजूला असलेल्या टोकदार खडकांमुळे शत्रूची जहाजे सिंधुदुर्गला लगट करू शकणार नव्हती त्यामुळे सिंधुदुर्ग किल्ल्याच्या सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून कुठलाच धोका नसल्याची कल्पना महाराजांना किल्ला उभारण्याची योजना आखताना आली होती.छत्रपती शिवाजी महाराजांच्या हस्ते

किल्ल्यांच्या तटांची पायाभरणी झाली हा किल्ला बांधण्यासाठी सुमारे एक कोटी होन खर्ची पडले तसेच किल्ला उभारणीसाठी तीन वर्षांचा कालावधी लागला. ज्याज्या कोळी लोकांनी सिंधुदुर्ग बांधण्यासाठी योग्य स्थळ शोधले त्यांना गावे इनामे देण्यात आली. ज्या खडकावर हा किल्ला बांधण्यात आला आहे त्या खडकावर समुद्र मार्गांनी व्यापलेले क्षेत्र ४८ एकर आहे. किल्ला बांधण्यासाठी त्यावेळी शिवाजी महाराजांनी पोर्तुगीजांकडून एकूण१०० आर्किटेक्ट आणि ३००० कामगार मागितले होते.या किल्ल्यातील पाण्याचे वैशिष्ट्य असे आहे की, किल्ल्याच्या सभोवती जरी खाऱ्या पाण्याचा समुद्र असला तरी या किल्ल्यात गोड्या पाण्याच्या विहिरी असून त्यांची नावे दूधबाव, दहिबाव आणि साखरबाव अशी आहेत. सिंधुदुर्ग किल्ल्यात४५ दगडी आणि मजबूत जिने आहेत तसेच आणखी एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे तटबंदीच्या भिंतीमध्ये ३५ ते ४० शौचालय बांधण्यात आली आहेत. यावरून शिवाजी महाराजांच्या स्वच्छतेविषयीची जागृतता दिसून येते किल्ल्यात वेगवेगळया ठिकाणी तोफा ठेवण्यासाठी जागेची व्यवस्था आहे आणि शत्रूचा हल्ला किल्ल्यावर झाल्यास त्याला रोखण्यासाठी किल्ल्याच्या तटबंदी भिंतींना छोटी-छोटी छिद्रे पाडून त्यातून बंदुकीने हल्ला केला जायचा सिंधुदुर्ग किल्ला बनविण्याचा मुख्य उद्देश म्हणजे किनाऱ्यावर वसलेल्या मराठी लोकांचे रक्षण करणे तसेच समुद्री युद्धाचा सामना करण्यासाठी व विदेशी व्यापाऱ्यांसाठी हा किल्ला समुद्रकिनाऱ्यावर बांधण्यात आला होता याखेरीज साम्राज्य बळकट करण्यासाठी, समुद्री मार्गाने होणारे हल्ले रोखण्यासाठी, विदेशी व्यापाऱ्यांकडून कर वसूल करण्यासाठी आणि भविष्यातील आरमारी सुरक्षा इत्यादी उद्दिष्ट डोळयासमोर ठेवून सिंधुदुर्ग किल्ल्याची निर्मिती करण्यात आली होती .

सिंधुदुर्गकिल्ल्याचे प्रवेशद्वार पूर्वेस आहे. पाण्यातून मनुष्य तटाजवळ उतरला की उत्तराभिमुख एक खिंड दिसते. या खिंडीतून आत गेल्यावर दुर्गाचा दरवाजा लागतो हा दरवाजा भक्कम अशा उंबराच्या फळ्यांपासून तयारकेला आहे. त्याला सागाच्या लाकडाची जोड दिली आहे. आत गेल्यावर मारुतीचे छोटेसे मंदिर आहे. तेथूनच बुरुजावर जाण्यासाठी मार्ग आहे. पश्चिमेकडे जरिमरीचे देऊळ आहे. आजही लोकांची वस्ती त्याठिकाणी आहे. श्री शिवराजेश्वरांचे देवालय व मंडपात महाराजांची अन्यत्र कुठल्याही किल्ल्यावर न दिसणारी बैठी प्रतिमा फक्त येथे दिसते. सिंधुदुर्ग किल्ल्याचे आणखी महत्त्वाचे वैशिष्ट्य

म्हणजे आजही दर बारा वर्षांनी रामेश्वराची पालखी शिवराजेश्वर येथे येते. इंग्रजांनी हा किल्ला ताब्यात घेतल्यानंतर काही प्रमाणात तो उद्ध्वस्त करून टाकला

सिंधुदुर्ग किल्ल्यात पर्यटकांना आकर्षित करणारी काही महत्त्वाचे ठिकाणी आहेतत्यात छत्रपती शिवाजी महाराजांचे मंदिर जे इ स.१३९५ मध्ये शिवाजी महाराजांचे धाकटे पु राजाराम यांनी सिंधुदुर्ग किल्ल्यावर बांधले आहे. या मंदिराचे एकूण क्षेत्रफळ १३मीटर बाय ७ मीटर आहे. आपण किल्ल्यामध्ये प्रवेश केल्यानंतर महाद्वाराच्या उजव्या बाजूला तटबंदीच्या भिंतीवर आपल्याला दोन दिवळ्या पाहायला मिळतात.त्यामधील एका दिवळी मध्ये शिवाजी महाराजांच्या डाव्या पायाचा ठसा आणि आणि दुसऱ्या दिवळीमध्ये शिवाजी महाराजांच्या उजव्या हाताचा ठसा आहे. शिवाजी महाराजांच्या मंदिराच्या थोडे पुढे गेल्यावर आपल्याला एक सभागृह पाहायला मिळते जे कोल्हापूरच्या शाहू महाराजांनी१९०७मध्ये बांधले आहे. तसेच सिंधुदुर्ग किल्ल्यावर आपल्याला छोटी मोठी मंदिरे पहायला मिळतात. त्यात द्वाररक्षक हनुमंत, महादेव, महापुरुष, भगवती देवी या देवांची मंदिरे किल्ल्यावर आहेतभवानी माता ही छत्रपती शिवाजी महाराजांची कुलदेवता आहे. त्यामुळे महाराजांनी बांधलेला जवळपास सर्वच किल्ल्यावर भवानीमातेचे मंदिर दिसून येते. या गडावरील भवानीमातेच्या उजव्या हातात त्रिशूळ व डाव्या हातात तलवार असलेली पाषाणातील सुरेख मूर्ती आहे तिचे मंदिर कौलारू आहे.

**निष्कर्ष:**

सिंधुदुर्ग किल्ला म्हणजेछत्रपती शिवाजी महाराज यांच्या दूरदृष्टीतून साकारलेला अभेद्य असा जलदुर्ग आहे'चौऱ्यांशी बंदरी ऐसा जागा नाही' हे उद्गार खुद्द शिवाजी महाराजांनी ज्या किल्ल्याविषयी काढले होते तो किल्ला म्हणजे सिंधुदुर्ग.गेली चारशे वर्षे हा ओजस्वी इतिहास सांगत सिंधुदुर्ग मालवणच्या समुद्रात उभा आहे. दुर्ग बांधणे व जतन करणे ही फारच खर्चिक बाब असताना देखील शिवाजी महाराजांनी काळाची गरज ओळखून हा किल्ला पूर्णत्वास नेऊन आरमारी सामर्थ्य वाढविले. शिवकालीन चित्रगुप्त या बखरीत सिंधुदुर्ग किल्ल्याचे वर्णन पुढील प्रमाणे करण्यात आले आहे."चौऱ्याऐंशी बंदरात हा जंजिरा, अठरा टोपीकरांची उरावर शिवलंका अजिंक्य जागा निर्माण केला सिंधुदुर्ग जंजिरा, जगी अस्मानी तारा जैसे मंदिराचे मंडन, श्री तुलसी वृंदावन राज्यात भूषण प्रद अलंकार चतुर्दशमहारत्नापैकीच पंधरावे रत्न

प्राप्त झाले."भारत सरकारने दिनांक २१ जून २०१०रोजी हा किल्ला महाराष्ट्रातील राष्ट्रीय संरक्षित स्मारकम्हणून जाहीर केला आहे.

**संदर्भसूची :**

१) भगवान पांडुरंग चिले– वेध जाल्दुर्गांचा, शिवस्पर्श प्रकाशन, कोल्हापूर,सप्टेंबर २००८

२) महेंद्र गोवेकर –नकाशातून दुर्गभ्रमंती,स्नेहल प्रकाशन, शनिवार पेठ, पुणे, २९ जून २०१४

३) गजानन भास्कर मेहेंदळे,संतोष प्र. शिंत्रे - शिवछत्रपतींचे आरमार, परम मित्र पब्लिकेशन्स, नौपाडा ठाणे, २५ ऑगस्ट २०१०

४) डॉ. ग. का. माने, डॉ, जि. एस.महाडिक – शिवकालीन किल्ल्यांचा समग्र अभ्यास,शिवनेरी पब्लिशर एंड डिस्ट्रीब्यूटर, ३ एप्रिल २००९

५) https://mr.wikipedia.org/s/zs

६) https://inmarathi.net/sindhudurg-fort-information-in-marathi/